पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – १६

**सभावृत्तांत**

दिनांक - **०६/०५/२०१६** वेळ – दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **०६/०५/२०१६** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. **मा. ताकवणे नंदा विकास - सभापती**
२. मा. पाडाळे निता विलास
३. मा. लोखंडे गोरक्ष जाकाराम
४. मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव
५. मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ

या शिवाय मा.डोईफोडे – सहा. आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.चव्हाण – कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले.**

विषय क्र.१) प्रजिमा ३१ रस्त्यावरील वाकड अंडरपास ते मनपा हद्दीपर्यंतचा ३० मी. रुंदीच्या रस्त्याचे रुंदीकरण व मजबूतीकरण करणे या कामातील विद्युत विषयक कामापैकी अंशत: कामाचे ठिकाण बदलणेस मान्यता मिळणेबाबत.

विषय क्र.२) सहाय्यक आयुक्त पदावर करावयाच्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत.

विषय क्र.३) मा.महापालिका सभेस अनुपस्थित राहणेबाबत - मा.भाऊसाहेब भोईर, मा.गोरक्ष लोखंडे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **१६/०४/२०१६** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १५)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**----------**

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक : ७१ विषय क्रमांक : १
दिनांक : ०६/०५/२०१६ विभाग – ड क्षेत्रीय कार्यालय (विद्युत)
सुचक : मा.निता पाडाळे अनुमोदक : मा.भाऊसाहेब भोईर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.डक्षे/वि/कावि/१७३/२०१६, दि.३०/०४/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

निविदा नोटीस क्र. ४६/१-२०१५-१६ निविदा रक्कम - २३,१४,६६,२९१/- ( निविदा दर - ३०.८७ टक्के कमी) प्रजिमा ३१ रस्त्यावरील वाकड अंडरपास ते मनपा हद्दीपर्यंतचा ३० मी. रूंदीच्या रस्त्याचे रूंदीकरण व मजबूतीकरण करणे या कामाचे आदेश मे. आजवानी इन्फ्रा.प्रा.लि. यांना आदेश क्र.स्था/लेखा/१/ ११०२/२०१६, दि. २२/०२/२०१६ अन्वये देण्यात आले आहे. सदर कामाची मुदत १८ महिने आहे. सदर कामात वरील विषयांकित ठिकाणी करावयाच्या विद्युतविषयक कामासाठी र.रू.२.२५ कोटी चा अंतर्भाव आहे. सदर ठिकाणी विद्युत विषयक काम ब क्षेत्रीय कार्यालयांतर्गत करणेत येत आहे. मनपा स्थापत्य विभाग ड क्षेत्रीय कार्यालय यांचेकडून प्र.क्र.५४ अंतर्गत कस्पटेवस्ती मनपा शाळा ते हिंजवडी बीआरटीएस रस्ता या प्रलंबित रस्त्याचे रस्ता रूंदीकरणाचे काम पोलिस बंदोबस्त घेऊन युद्ध पातळीवर सुरू केलेले आहे. सद्यस्थितीत रस्ता रूंदीकरणात मराविवि कं च्या केबल व फिडर (HT/LT) अडथळा ठरत आहेत. त्यामुळे रस्ता रूंदीकरणाचे काम रखडलेले आहे. त्यामुळे सदर ठिकाणी विद्युत विषयक कामे त्वरीत सुरू करून सदर अडथळे काढून देण्याबाबत स्थापत्य विभागाने त्यांचेकडील पत्र क्र. डक्षे/स्था/१/कावि/३९९/ २०१६, दि. २५/०४/२०१६ अन्वये इकडील विभागास कळविले आहे. अशा प्रकारचे काम ड क्षेत्रीय कार्यालय विद्युत विभागाकडे सध्या सुरू नाही. सदरचे काम तातडीने सुरु करुन पूर्ण करणेसाठी सद्या सुरु असलेल्या अशा प्रकारच्या विद्युत ब क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यकक्षेतील सुरू असलेल्या कामातून हे काम करणे शक्य आहे. सदरचे काम करणेसाठी र.रू. ५७,५७,५२२/- एवढा खर्च अपेक्षित आहे. हा खर्च मूळ कामातील विद्युत विषयक कामाच्या र.रू.२.२५ कोटी या रक्कमेतून करणेत येणार आहे. सदचे काम त्याच निविदा दराने (३०.८७ टक्के कमी) विषयांकित कामातून करणेसाठी मूळ कामाच्या ठिकाणामध्ये बदल होणार आहे. तरी प्रस्तावित केलेप्रमाणे सदर कामाच्या ठिकाणाच्या बदलास ( **Change of Site** ) मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ७२ विषय क्रमांक : २
दिनांक : ०६/०५/२०१६ विभाग – प्रशासन
सुचक : मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक : मा.गोरक्ष लोखंडे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/२७७/२०१६, दि.३०/०४/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर सहाय्यक आयुक्त अभिनामाची 11 पदे पे बॅन्ड र.रु. 15600-39100 ग्रेड वेतन र.रु. 6600 या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. दि. 04 मे 2006 चे शासन निर्णयानुसार महापालिका आस्थापनेवरील 50% पदे महापालिका संवर्गातून तर 50% पदे शासनाच्या अधिका-यांमधून भरण्याचे निर्देश आहेत. तथापि शासन पत्र क्र.एमसीओ-1211/ प्र.क्र.157/नवि-14, दि.22/09/2011 अन्वये या संवर्गात मंजूर 11 पदांपैकी 6 पदे मुख्याधिकारी संवर्गातून

भरण्याबाबत कळविले आहे. सद्यस्थितीत या संवर्गात महापालिकेचे 3 तर प्रतिनियुक्तीवरील 8 अधिकारी कार्यरत आहेत. यास्तव महापालिका अधिका-यांकरीता रिक्त असलेल्या 2 पदांवर शासन प्रतिनियुक्तीवरील अधिकारी कार्यरत आहेत.

शासन प्रतिनियुक्तीवरील अधिका-यांपैकी श्री.खांडकेकर प्रशांत, सहा. आयुक्त यांचे शासन आदेश दि.16 डिसेंबर 2015 अन्वये शासन सेवेत प्रत्यावर्तन करण्यात आलेले आहे. श्री.खांडकेकर यांना कार्यमुक्त केल्यानंतर सहाय्यक आयुक्त या संवर्गात रिक्त होणारे खुल्या प्रवर्गाचे 01 पद पदोन्नतीने भरण्याकरीता दि.29/03/2016 रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती.

प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने "सहाय्यक आयुक्त" पदावरील पदोन्नतीबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेतलेले आहेत.

1. दि.04/05/2006 रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील महापालिका सेवांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. त्यामध्ये नमूद तरतुदीनुसार कामगार कल्याण अधिकारी हे पद प्रशासकीय सेवामधील प्रशासन अधिकारी या पदाचे समकक्ष ग्राह्य धरण्याबाबत प्रस्तुतच्या समितीने शिफारस केलेली आहे.

2. शासन निर्णय क्र.एसआरव्ही-2014/प्र.क्र.354/14/का.12, दि.05/10/2015 मध्ये ज्या पदांच्या सेवाप्रवेश नियमामध्ये पदोन्नतीसाठी निम्न पदांवरील अनुभवाचा किमान कालावधी विवक्षित कारणात्सव 3 वर्षापेक्षा जास्त विहित केला असेल अशा प्रकरणी निम्न संवर्गात विहित सेवा कालावधी पूर्ण केलेले अधिकारी/कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त राहत असतील तर निम्न संवर्गात आवश्यक किमान सेवेच्या 90 टक्के नियमित सेवा झाल्यानंतर व अनुभवाची अट शिथिल करण्यासाठी संबंधित प्रशासकीय विभागाकडे पुरेसे समर्थन असेल तर असा उर्वरित सेवा कालावधीची अट शिथिल करण्याबाबतचा प्रस्ताव दि.16/07/2015 रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आलेल्या अप्पर मुख्य सचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखालील समितीसमोर निर्णयार्थ सादर करता येतील याप्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे. प्रस्तुतच्या तरतुदीनुसार सहाय्यक आयुक्त पदावरील पदोन्नतीकरीता पदोन्नतीपूर्व पदावर 5 वर्ष अनुभव कालावधी शिथिल करण्याबाबत प्रस्तुतच्या समितीने शिफारस केली आहे.

3. श्री. प्रशांत खांडकेकर, मुख्याधिकारी यांचे शासन दि.16 डिसेंबर 2015 अन्वये शासन सेवेत प्रत्यावर्तन झाले असल्याने त्यांना महापालिका सेवेमधून कार्यमुक्त करण्यात आल्यावर महापालिका संवर्गातील अधिका-यांकरीता उपलब्ध असलेले सहाय्यक आयुक्त अभिनामाचे खुल्या प्रवर्गाकरीता येणारे रिक्त पद पदोन्नतीने भरण्याकरीता पदोन्नतीपूर्व प्रशासन अधिकारी पदावर अर्हताधारक उमेदवार उपलब्ध होत नसल्याने शासन निर्णय दि.04/05/2006 मधील तरतुदीनुसार तहसिलदार समकक्ष कामगार कल्याण अधिकारी पदावरील श्री. इंदलकर चंद्रकांत पोपट यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल व आरक्षण इत्यादि सेवाविषयक तपशिल विचारात घेऊन, शासन निर्णय दि.05/10/2015 मधील तरतुदीनुसार अनुभव कालावधी शिथिल करुन वेतनश्रेणी र.रु. 15600-39100 ग्रेड पे 6600 सहाय्यक आयुक्त या पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 45 (4) मधील तरतुदीनुसार शासन मान्यतेच्या अधिन मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्याबाबत प्रस्तुतच्या समितीने शिफारस केलेली असल्याने शासन निर्णय दि.04/05/2006 नुसार कामगार कल्याण अधिकारी हे पद प्रशासकीय सेवेमधील प्रशासन अधिकारी या पदाचे समकक्ष ग्राह्य धरण्यास आणि शासन निर्णय दि.05/10/2015 नुसार पदोन्नतीपूर्व पदावरील 90% नियमित सेवा ग्राह्य धरुन श्री. इंदलकर चंद्रकांत पोपट, कामगार कल्याण अधिकारी यांना खुल्या प्रवर्गामधून र.रु.15600-39100 ग्रेड पे 6600 या वेतनश्रेणीमध्ये सहाय्यक आयुक्त या पदावर महाराष्ट्र महानगरपालिका

अधिनियम कलम 45 (4) मधील तरतुदीनुसार शासन मान्यतेच्या अधिन पदोन्नती देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफरस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ७३ विषय क्रमांक : ३

दिनांक : ०६/०५/२०१६

सुचक : मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक : मा.गोरक्ष लोखंडे

संदर्भ : मा.भाऊसाहेब भोईर, मा.गोरक्ष लोखंडे यांचा प्रस्ताव -

मा. जितेंद्र बाबा ननवरे यांची माहे एप्रिल २०१६ च्या दि.२०/०४/२०१६ रोजी होणा-या मा.महापालिका सभेची अनुपस्थिती बाहेरगांवी असल्याचे कारणास्तव मंजूर करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **नंदा विकास ताकवणे** )
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/२६३/२०१६
दिनांक : ०६/०५/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.